# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

**(०२४०)२३३४२१६ (P) २३३४७६९ (O) Fax-२३५६८२०**

**website: www.dteau.org email: educationsection@dteau.org**


जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०१६/03(09)

दिनांक 23 DEC 2016.

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/निमशासकीय अनुदानित
पदवी / पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
औरंगाबाद विभाग

विषयः- शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी योजना.

संदर्भः- ०१. महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण, पुणे यांचे पत्र क्र. इसीएन/२०१६-१७/सीआर-०३/३७५० दिनांक ३१.०८.२०१६.

०२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. ११ /तंशिसं / महाउर्जा/ २०१६-१७/७३८ दिनांक १७.१०.२०१६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये शासकीय / निमशासकीय संस्था यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्य योजना राबविण्याबाबत संदर्भ.क्र.१ अन्वये कळविले आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी सोबत जोडलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार कार्यवाही करावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबतः- संदर्भिय पत्र व शासन निर्णय प्रत.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,

## ३,महापालिका मार्ग,पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई -४०० ००१

E-mail:- desk11 dte@gmail. Internet: dtemahsrashtra.gov.in

दूरध्वनी : ०२२-३०२३३४७०/४११/४३१,२२६९०६०२,२२६४११५०/५१ , फॅक्स 22692102/22690007


---

क्रमांक -११/तंशिसं/महाउर्जा/२०१६-१७/ ७३८

दि. १७/१०/२०१६

प्रति,

सहसंचालक,

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती.

विषय - शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थां यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याची योजना.

संदर्भ :- महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण,पुणे यांचे पत्र क्र.इसीएन/२०१६-१७/सीआर-०३/३७५०, दि.३१/०८/२०१६.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रान्वये शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थां यामध्ये उर्जा संवर्धनास , चालना देण्यासाठी उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याची योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थां यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याची योजना राबविण्याबाबत आपल्या अधिनस्त संस्थांना आपल्यास्तरावरुन कळविण्यात यावे. तसेच त्यासोबतचे सहपत्र जोडले आहे.

(डॉ.सुभाष महाजन)

संचालक,

तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

श्री.हेमंत पाटील,व्यवस्थापक (उर्जा संवर्धन),महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण,स.न.१९१,फेज-१,म्हाडा वाणिज्य संकुल, दुसरा मजला,त्रिदलनगर समोर,येरवडा,पुणे-४११ ००६.


सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
जावक 938
दिनांक 25 OCT 2016

# महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण

(महाराष्ट्र शासनाची संस्था)

इसीएन/२०१६-१७/सीआर-०३/३७५०

३१ ऑगस्ट, २०१६

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग,
पोस्ट बॉक्स नं.१९६७,
मेट्रो सिनेमासमोर, मुंबई – ४००००१.

**विषय - शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये ऊर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याची योजना.**
**संदर्भ** - शासन निर्णय क्र. अपाऊ २०१०/प्र.क्र. ४७०/ऊर्जा - ७ दि. १३ जानेवारी, २०११.

महोदय,

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) ही राज्यात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा विकास व ऊर्जा संवर्धनाचा प्रसार करणारी मूलाधार संस्था आहे. केंद्र शासनाने ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ पारित केला असून सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ब्युरो ऑफ एनर्जी एफिशिअन्सी, (बी.इ.इ.), भारत सरकार यांची नेमणूक राष्ट्रीय स्तरावर करण्यात आली आहे. ऊर्जा संवर्धन कायदा, २००१ बाबत व निगडित योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी पदनिर्देशित संस्था म्हणून राज्य स्तरावर महाऊर्जाची नेमणूक करण्यात आली आहे.

ऊर्जा संवर्धनासाठी / ऊर्जा बचतीसाठी शासकीय क्षेत्रात खूप मोठा वाव आहे. ऊर्जा बचतीसाठीचे तंत्रज्ञान निरंतर विकसित होत आहे. सदर तंत्रज्ञान वापरास चालना देणे महत्वाचे आहे. ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने नव्याने उपलब्ध होत असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक असून त्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविल्यास अशा तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार होण्यास चालना मिळेल. वरील शासन निर्णयाद्वारे ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी शासकीय /निमशासकीय विभागांना/स्थानिक स्वराज्य संस्थांना कार्यालयांना अर्थसहाय्य करण्याची योजना महाऊर्जाकडून हाती घेण्यात आली आहे.

सदर योजनेत शासकीय / निमशासकीय कार्यालये/ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडील एका कार्यालयामध्ये / इमारतीमध्ये ऊर्जा संवर्धन प्रकल्प पथदर्शी पध्दतीने राबविण्यासाठी महाऊर्जाकडून रु. २५ लाख पर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर योजनेचा शासन निर्णय व मार्गदर्शक सूचना या सोबत सुलभ संदर्भासाठी जोडण्यात आल्या आहेत. कृपया आपल्याकडील सर्व संबंधितांना सदर योजनेत सहभागी होण्यासाठी आपणाकडून कळविण्यात यावे ही विनंती.

२४६१९
१७.९.१६

- 6 SEP 2016

आपला विश्वासू,

(हेमंत पाटील)
व्यवस्थापक (ऊर्जा संवर्धन)

(१६) ११

सोबत :- वरील प्रमाणे.

[प्लॉ]ट नं. १११, फेज-१, म्हाडा वाणिज्य संकुल, दुसरा मजला, त्रिदलनगर समोर, येरवडा, पुणे ४११ ००६. दूरध्वनी : ०२०-२६६१४३९३ / २६६१४४०३
फॅक्स : ०२०-२६६१५०३१, E-mail : meda@mahaurja.com Web-site : http://www.mahaurja.com

तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
३,महापालिका मार्ग,पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई -४०० ००१
E-mail:- desk11 dte@gmail. Internet: dtemahsrashtra.gov.in
दूरध्वनी : ०२२-३०२३३४७०/४११/४३१,२२६९०६०२,२२६४११५०/५१ , फॅक्स 22692102/22690007

---

क्रमांक -११/तंशिसं/महाउर्जा/२०१६-१७/ ७३८
दि. १८/१०/२०१६

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती.

विषय - शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थां यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याची योजना.
संदर्भ :- महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण,पुणे यांचे पत्र क्र.इसीएन/२०१६-१७/सीआर-०३/३७५०, दि.३१/०८/२०१६.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन पत्रान्वये शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थां यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याची योजना राबविण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थां यामध्ये उर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी उर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याची योजना राबविण्याबाबत आपल्या अधिनस्त संस्थांना आपल्यास्तरावरुन कळविण्यात यावे. तसेच त्यासोबतचे सहपत्र जोडले आहे.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
श्री.हेमंत पाटील,व्यवस्थापक (उर्जा संवर्धन),महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण,सं.न.१९१,फेज-१,म्हाडा वाणिज्य संकुल, दुसरा मजला,त्रिदलनगर समोर,येरवडा,पुणे-४११ ००६.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
९३८
दिनांक 25 OCT 2016

**शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतीमध्ये ऊर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याची योजना.**

**महाराष्ट्र शासन**
**शासन निर्णय क्र.अपाऊ २०१०/प्र.क्र.४७०/ऊर्जा-७**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-३२**
**दिनांक : १३ जानेवारी, २०११**

**प्रस्तावना-**

शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धनासाठी / ऊर्जा बचतीसाठी प्रत्येक क्षेत्रात सुमारे २५ ते ५० टक्के वाव आहे. ऊर्जा बचतीसाठीचे तंत्रज्ञान विकसित होण्याची प्रक्रिया निरंतर स्वरुपाची आहे. सदर तंत्रज्ञान वापरास पाहिजे तेवढया गतीने चालना मिळत नसल्याने आणि नवीन तंत्रज्ञान हे सुरुवातीस तुलनेने महाग असल्याने त्याच्या वापरासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने नव्याने उपलब्ध होत असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करुन त्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबवून जनतेस उदाहरण म्हणून दिल्यास अशा तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार होण्यास चालना मिळेल. शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडील एखाद्या इमारतीमध्ये ऊर्जा संवर्धन प्रकल्प पथदर्शी पध्दतीने राबविल्यास त्या संबंधित विभागामध्ये ऊर्जा संवर्धनाची संकल्पना रुजविण्यास मदत होईल. त्यासाठी शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रकल्प राबविण्यासाठी अर्थ सहाय्य उपलब्ध करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

राज्यातील शासकीय/ निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारितील इमारतींमध्ये खालीलप्रमाणे ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अ. योजनेची तांत्रिक माहिती व परिमाण -**

शासकीय/ निमशासकीय संस्था / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अखत्यारितील एका इमारतीत ऊर्जा संवर्धनाचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी एका वित्तीय वर्षात एकूण रु. २५ लाखापर्यंत अर्थसहाय्य महाऊर्जामार्फत उपलब्ध करता येईल व त्यासाठी लागणारे तांत्रिक सहाय्यही महाऊर्जाकडून उपलब्ध करण्यात येईल.सदर पथदर्शी प्रकल्पांतर्गत इमारतींमध्ये वापरात असलेली जुन्या तंत्रज्ञानाची उपकरणे / यंत्रणा काढून नवीन तंत्रज्ञानावर आधारित उपकरणे बसविणे, उपकरणे/ यंत्रणा यांमध्ये


रोटा/एच-२०११[बी][१०००-१-२०११]-१
T- 90739

आवश्यकतेनुसार बदल करणे, ऊर्जा बचतीसाठी अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा किफायतशीर वापर करणे, इमारतींमध्ये ऊर्जा वापर मोजमाप व मॉनिटरींग करणारी यंत्रणा बसविणे इत्यादिचा समावेश असेल.

**ख. योजनेची अंमलबजावणी**

सदर पथदर्शी प्रकल्पांतर्गत योजनेची माहिती सर्व शासकीय विभागांना तसेच त्यांचे अखत्यारितील निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांना महाऊर्जामार्फत कळविण्यात येऊन ज्या शासकीय विभाग/ निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थांची सहभागी होण्याची इच्छा असेल, त्यांनी ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्पासाठी इमारतीची निवड करावी. त्यासाठी सदर इमारतीचे ऊर्जा परीक्षण महाऊर्जाकडील नोंदणीकृत ऊर्जा परीक्षण संस्थेकडून करण्यात यावे. ऊर्जा परीक्षण अहवालातील सुचविलेल्या ऊर्जा बचतीच्या उपाययोजनांच्या अनुषंगाने प्रस्ताव योजनेत सहभागी होणाऱ्या संबंधित संस्थाकडून महाऊर्जाकडे सादर करण्यात आल्यानंतर महाऊर्जाकडून आवश्यक ती तांत्रिक छाननी करण्यात येईल. सदर योजनेत सहभागी होणाऱ्या संबंधित संस्थांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले जाईल. याकरिता प्रकल्पाची निविदा प्रक्रिया करणे, प्रकल्प राबविणे व हमी कालावधीनंतर देखभाल दुरुस्ती करणे तसेच योजनेच्या अनुषंगाने उदभवणा-या इतर बाबींची पूर्तता संबंधित संस्थांकडून करण्यात येईल. प्रकल्प राबविण्यासाठी महाऊर्जाकडून तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना महाऊर्जाकडून निर्गमित करण्यात येतील व त्या संबंधित संस्थांना बंधनकारक असतील. तसेच योजनेच्या अंमलबजावणीचा प्रगती अहवाल महाऊर्जा शासनास सादर करील.

सदर योजनेसाठी आर्थिक तरतूद करण्याची, अनुदानाचे निकष ठरविण्यांची, योजनेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची तसेच तांत्रिक बाबी निश्चित करण्याची जबाबदारी महाऊर्जाची राहील.

**क. आर्थिक तरतूद**

सदर योजना सन २०१०-११ पासून राबविण्यासाठी मान्यता देण्यात येत असून, यासाठी होणारा खर्च "२८१०-वीज- अपारंपारिक ऊर्जा साधने "या मुख्य लेखाशिर्षा खाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

( सु. दि. पारधी )
प्रभारी अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

अध्यक्ष.महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग, मुंबई.( पत्राने )

C:\Documents and Settings\admin\Desktop\c.r.४७०.doc-१-१-११-४.doc

महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), म्हाडा कमर्शियल कॉम्पलेक्स, त्रिदलनगरसमोर, येरवडा, पुणे-४११ ००६

प्रधान सचिव, मुख्यमंत्र्याचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई.

सचिव, उपमुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय,मुंबई.

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.

अप्पर मुख्य सचिव,( सामान्य प्रशासन विभाग). मंत्रालय,मुंबई.

अप्पर मुख्य सचिव ( नियोजन ), मंत्रालय,मुंबई.

अप्पर मुख्य सचिव ( महसूल ),मंत्रालय,मुंबई.

अप्पर मुख्य सचिव( वने),मंत्रालय,मुंबई.

प्रधान सचिव( वित्त), मंत्रालय,मुंबई.

प्रधान सचिव( उद्योग ), मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव ( आदिवासी ) मंत्रालय,मुंबई.

प्रधान सचिव ( नगरविकास-२ ), मंत्रालय,मुंबई.

सचिव( ग्राम विकास ) मंत्रालय, मुंबई.

सचिव ( सार्वजनिक बांधकाम विभाग),मंत्रालय,मुंबई.

प्रधान सचिव (सहकार)मंत्रालय, मुंबई.

खाजगी सचिव ,मा. मंत्री( अपाऊ), मंत्रालय,मुंबई.

खाजगी सचिव सर्व मा. मंत्री/ मा.राज्यमंत्री, मंत्रालय,मुंबई.

सर्व परवानाधारक कंपन्या.

विकास आयुक्त,( उद्योग ) उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई.

मुख्य अभियंता ( विद्युत ) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रशासकीय इमारत ३ रा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर ( पूर्व), मुंबई-७१.

व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१

व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१

व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, मुंबई-४०० ०५१

व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,मुंबई-४०० ०५१

सर्व मंत्रालयीन विभाग.

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य /विधान परिषद सदस्य.

सर्व महानगरपालिका/ नगरपालिका / जिल्हा परिषदा.

ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.

निवड नस्ती ( ऊर्जा-७ ) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

---------

## शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतीमध्ये ऊर्जा संवर्धनास चालना देण्यासाठी ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी अर्थसहाय्याच्या योजनेबाबत मार्गदर्शक सूचना.

१. सदर योजनेत इमारतींमध्ये वापरात असलेली जुन्या तंत्रज्ञानाची विद्युत उपकरणे / यंत्रणा काढून नवीन तंत्रज्ञानावर आधारित उपकरणे बसविणे अपेक्षित आहे. जुनी उपकरणे बदलताना साधारणत: ५ ते १० वर्ष जुनी असलेली व जादा वापर असलेली उपकरणे बदलणे योग्य असते. उपकरणे बदलण्याने ऊर्जेची अधिकाधिक बचत व्हावी यासाठी प्रयत्न करावयाचा आहे.

२. सदर योजनेतील प्रस्तावांमध्ये समाविष्ट करता येण्यासारख्या काही बाबी उदाहरणादाखल खाली दिल्या आहेत.
अ) ऊर्जा वापर, मोजमाप व मॉनिटरिंग करणारी यंत्रणा बसविणे.
ब) बी. इ. इ. भारत सरकार यांच्याकडील मानांकन असलेली स्टार लेबल उपकरणे बसविणे.
क) विजेचे गीझर बदलून सौर उष्णजल संयंत्र बसविणे.
ड) टी-५, टी-८ टयुब लाइट, एल.इ.डी. दिवे, इलेक्ट्रॉनिक बलास्ट, हीट पंप, पाण्याच्या पंपासाठी सबमर्सिबल पंप, उद्वाहनासाठी व्ही.व्ही.एफ. ड्राइव्ह, हायड्रो न्यूमॅटिक यंत्रणा, निष्कासित उष्णतेचा पुनर्वापर करणारी यंत्रणा इ. उपकरणे आवश्यकतेनुसार बसविणे.

वरील बाबींशिवाय अन्य उपाय प्रस्तावांमध्ये समाविष्ट करता येतील.

३. प्रस्तावासोबत ऊर्जा परीक्षण अहवाल, प्रकल्प अहवाल, शक्य होणारी ऊर्जा बचत याचे सविस्तर विवरण, परतावा कालावधी, सविस्तर अंदाजपत्रके इ. बाबी सादर करणे आवश्यक आहे. प्रकल्पाचा परतावा कालावधी २ ते ३ वर्ष असावा. प्रस्तावासोबत परिशिष्ट – १ मधील माहिती व परिशिष्ट – २ नुसार हमीपत्र जोडण्यात यावे.

४. शासन निर्णय क्र.अपाऊ२०१६/प्र.क्र.११६/ऊर्जा - ७, दि.८ जून, २०१६ अन्वये महाऊर्जाकडील नोंदणीकृत Govt./Semi-Govt. /Local Govt. - Sector Code ११ या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागारांकडून इमारतीचा ऊर्जा परीक्षण अहवाल तयार करता येईल. ऊर्जा परीक्षण अहवालात सुचविलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी तयार करावयाच्या अंदाजपत्रकासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसूची अथवा इतर शासकीय/निमशासकीय दरसूचीचा वापर करता येईल. नवीन उपकरणांचा गॅरंटी कालावधी किमान १ ते २ वर्ष असावा. जुनी उपकरणे बदलल्यानंतर त्याचा पुन्हा वापर होणार नाही याची दक्षता घ्यावी व तसे प्रमाणपत्र प्रकल्प अहवालात समाविष्ट करावे.

५. निधी उपलब्धतेनुसार महाऊर्जातर्फे कमाल रु. २५ लाखापर्यंत आर्थिक सहाय्य करण्यात येईल. सदर पथदर्शी प्रकल्पास अधिक निधीची आवश्यकता असल्यास त्या आर्थिक वर्षात त्याची तरतूद केल्याचे संबंधित प्रकल्पधारकाने पुरावा म्हणून अंदाजपत्रकीय तरतुदीबाबतची मंजुरी प्रस्तावासोबत सादर करावी. स्थानिक स्वराज्य संस्था प्रकल्पधारक असल्यास सर्व साधारण सभेची मंजुरी प्रस्तावासोबत पाठविणे आवश्यक आहे.

६. महाऊर्जातर्फे प्रस्तावाची छाननी करण्यात येऊन सदर प्रस्तावास तत्वत: मंजुरी देण्यात येईल. प्रस्तावाची छाननी करताना आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता आवश्यकतेनुसार करुन घेण्यात येईल. प्रस्तावांच्या छाननीमध्ये कमीतकमी परतावा कालावधी तसेच नावीन्यपूर्ण व तांत्रिकदृष्ट्या सक्षमता या बाबींचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

७. महाऊर्जातर्फे प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यकतेनुसार वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करण्यात येईल. प्रकल्पासाठी प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक मंजुरी, निविदा प्रकिया इ. प्रक्रिया संबंधित प्रकल्प धारकाने त्यांच्याकडील प्रचलित पद्धतीने करावयाची आहे.

८. प्रकल्प राबवितांना व पूर्ण झाल्यावर महाऊर्जातर्फे निरीक्षण करण्यात येईल. प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्याचा तपशील दाखविणारा फलक दर्शनी स्थळी लावण्यात यावा.

ANNEXURE 'I'

# INFORMATION ABOUT INSTITUTION/PROJECT

## I. GENERAL DETAILS

| S. NO. | PARTICULARS | DETAILS | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Name & Address of Institution / Project Holder | | | | |
| 2 | a. Name and Address of Building for implementation of the Project | | | | |
| | b. Name of Nodal Officer | | | | |
| | c. Designation | | | | |
| | d. Telephone No. | | | | |
| | e. Fax No. | | | | |
| | f. E-mail | | | | |
| 3 | Nature of building (Administrative, Commercial/Hospital/Residential) | | | | |
| 4 | Total Floor Area ( in Sq. Mtrs) | | | | |
| 5 | No. of Employees | | | | |
| 6 | a. No. of working hours | | | | |
| | b. Total working days per year | | | | |
| 7 | a. Type of Fuel used | Gas | Oil | Coal | Others |
| | b. Annual Fuel Consumption (KL/Ton/SM3/Other) | | | | |
| 8 | a. Electricity Consumption (kWh) | | | | |
| | b. Electricity from Distribution Licensee | | | | |
| | c. Electricity from TG/DG sets (Captive) | | | | |
| 9 | Whether Energy Audit is conducted? If Yes, when? Please attach a copy of the Energy Audit Report. | | | | |
| 10 | Name of authority to whom the cheque to be issued for availing financial assistance | | | | |

**इतर मार्गदर्शक सूचना:**

१. संबंधित प्रकल्प धारकास निधी उपलब्धतेनुसार तत्वत: मंजुरीनंतर निधी सुपूर्द करण्यात येईल. प्रकल्प धारकाने आवश्यकतेनुसार डिपॉझिट हेड म्हणून सदर निधी वर्ग करावा. सदर निधीसाठी स्वतंत्र लेखे तयार करण्यात यावे.

२. सदर निधी हा ज्या कामासाठी मंजूर करण्यात आला आहे त्या कामावरच खर्च करावा. इतर कामांवर खर्च केल्यास त्यावर १० टक्के व्याज आकारण्यात येईल. सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यावरच संबंधितांस देयक अदा करण्यात यावे. सदर कामाचे ठेकेदारास / पुरवठादारास अग्रीम देण्यात येऊ नये.

३. प्रकल्प राबविण्याचा कालावधी निधी प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त १ वर्ष असेल.

४. सदर प्रकल्प राबविल्यानंतर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र व खर्चाचा तपशील १ महिन्यात महाऊर्जास सादर करणे बंधनकारक आहे.

५. प्रकल्प पूर्ण झाल्यावर ६ महिन्यानंतर सदर प्रकल्पापासून होणाऱ्या ऊर्जा बचतीचा सविस्तर अहवाल वीज देयकासह महाऊर्जाकडे पाठविणे आवश्यक आहे.

६. सदर प्रकल्पाची देखभाल दुरुस्ती करणे व हमी कालावधीनंतर प्रकल्प कार्यरत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे या बाबी संबंधित प्रकल्पधारकाने करावयाच्या आहेत. त्यासाठी महाऊर्जाकडून कोणताही निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

७. सदर प्रकल्पाविषयी सर्व प्रकारचे कामकाज पाहण्यासाठी संबंधित प्रकल्प धारकाने सक्षम नोडल ऑफिसरची नेमणूक करुन महाऊर्जा कार्यालयास कळवावे.

८. सदर योजनांसाठीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल करण्याचे अधिकार महाऊर्जाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

९. सदर मार्गदर्शक सूचना वित्तवर्ष २०१६-१७ या वर्षासाठी लागू राहतील.

ANNEXURE 'I'

## INFORMATION ABOUT INSTITUTION/PROJECT

### I. GENERAL DETAILS

| S. NO. | PARTICULARS | DETAILS | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Name & Address of Institution / Project Holder | | | | |
| 2 | a. Name and Address of Building for implementation of the Project | | | | |
| | b. Name of Nodal Officer | | | | |
| | c. Designation | | | | |
| | d. Telephone No. | | | | |
| | e. Fax No. | | | | |
| | f. E-mail | | | | |
| 3 | Nature of building (Administrative, Commercial/Hospital/Residential) | | | | |
| 4 | Total Floor Area ( in Sq. Mtrs) | | | | |
| 5 | No. of Employees | | | | |
| 6 | a. No. of working hours | | | | |
| | b. Total working days per year | | | | |
| 7 | a. Type of Fuel used | Gas | Oil | Coal | Others |
| | b. Annual Fuel Consumption (KL/Ton/SM3/Other) | | | | |
| 8 | a. Electricity Consumption (kWh) | | | | |
| | b. Electricity from Distribution Licensee | | | | |
| | c. Electricity from TG/DG sets (Captive) | | | | |
| 9 | Whether Energy Audit is conducted? If Yes, when? Please attach a copy of the Energy Audit Report. | | | | |
| 10 | Name of authority to whom the cheque to be issued for availing financial assistance | | | | |

## II. ELECTRICAL DETAILS

### 1. CONSUMPTION

| Sr. No. | PARTICULARS | DEMAND |
|---|---|---|
| 1 | Contract demand kVA | |
| 2 | Maximum demand | |
| 3 | Sanctioned Load kW | |
| 4 | Total Energy units consumed per day | |
| 5 | Avg. Power Factor (P.F.) | |
| 6 | Avg. Energy bills (Rs/month) | |
| 7 | kVA Load Peak kVA Duration | Morning Noon Night |

### 2. CONNECTED LOAD

| Sr. No. | EQUIPMENT | Nos. | TOTAL LOAD (kW) |
|---|---|---|---|
| A | Motors/Pump < 10 HP | | |
| | > 10 HP | | |
| B | Compressors Details | Rated CFM | |
| C | AC & Ventilation with TR capacity | TR CAP | |
| D | Air Conditioning Plant | | |
| E | A. H. U. | | |
| F | No. of Computers & load in KW | | |
| G | No. of Ceiling fans & load in KW | | |
| H | Others (Lifts/ water coolers/compound lighting, Geysers etc.) | | |
| I | Process Load | | |
| J | Illumination/lighting | | |
| | **Total Connected Load in kW** | | |

परिशिष्ट — २

# योजनेत सहभागी होणाऱ्या प्रकल्पधारकाने(विभाग/संस्था/कार्यालय) द्यावयाचे हमीपत्र

**(संबंधित विभाग/संस्था/ कार्यालय यांच्याकडील सक्षम प्राधिकाऱ्याने द्यावयाचे हमीपत्र)**

प्रमाणित करण्यात येते की ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प योजनेचा शासन निर्णय व मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करण्यात आले असून त्यामधील बाबींचे अनुपालन करण्याचे आम्ही ठरविले आहे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेण्यात आली असून आवश्यक तेथे आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी व त्यानंतर देखभाल दुरूस्तीसाठी तसेच प्रकल्प कार्यरत ठेवण्याची तजवीज आम्ही ठेवली आहे. प्रस्तावातील व प्रस्तावासोबत सादर करण्यात येणाऱ्या सर्व माहितीची पडताळणी करण्यात आली आहे. या प्रकल्पाविषयी व ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञानाविषयी आमच्याकडून जनजागृती करण्यात येईल.

**सही**
**(नाव-..........................)**
**पदनाम-......................**
**शिक्का**